28 DEC 2018
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. एन. डी. पाटील यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : खासदार शरद पवार यांच्या हस्ते १२ जानेवारीला प्रदान समारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य आर. के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांना गुरुवारी जाहीर करण्यात आला. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात शनिवार, दि. १२ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान समारंभ होईल, अशी घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

यावेळी शोध समिती सदस्य डॉ. जे. एफ. पाटील उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतिनिमित्त राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे २५ लाख रुपयांची ठेव प्रदान केली आहे. शालिनी कणबरकर यांच्यासमवेत झालेल्या सामंजस्य करारातून शिवाजी विद्यापीठाच्या या



माजी कुलगुरूंच्या स्मृतीनिमित्त 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कारा'ची संयुक्त निर्मिती करण्यात आली. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अन्य क्षेत्रांत अत्युत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार देण्यात येतो. १ लाख ५१ हजार रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

यापूर्वी ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी.एन.आर. राव, रयत शिक्षण संस्था, ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

यावेळी पुरस्कारासंदर्भात अधिक माहिती देताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले की, ज्येष्ठ नेते व विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक जडणघडणीत महत्त्वाचे योगदान आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी आग्रही असणाऱ्यांत ते आघाडीवर आहेत. विद्यापीठाच्या पहिल्या सल्लागार समितीच्या सदस्यत्वापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास पुढे अधिसभा सदस्य, कार्यकारिणी सदस्य, सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता असा अनेकांगांनी झाला. शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या योगदानाबद्दल सन २००६ मध्ये विद्यापीठाची सर्वोच्च मानद पदवी डी.लिट. देऊन त्यांचा गौरव केला आहे.

शोध समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, समितीच्या अवघ्या एकाच बैठकीत आणि एकमताने यंदाच्या पुरस्कारासाठी डॉ. एन. डी. पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, शोध समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य डॉ. बी. ए. खोत आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2018
लोकसत्ता

# प्राचार्य आर.के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार डॉ. एन.डी. पाटील यांना जाहीर

प्रतिनिधी, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठाच्या** वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य आर.के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन.डी. पाटील यांना गुरुवारी जाहीर करण्यात आला. १ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. अशी घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

प्राचार्य रा.कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यपीठाकडे २५ लाख रुपयांची ठेव प्रदान केली आहे. श्रीमती शालिनी कणबरकर यांच्यासमवेत झालेल्या सामंजस्य करारातून या पुरस्काराची संयुक्त निर्मिती करण्यात आली. यापूर्वी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी.एन.आर. राव , रयत शिक्षण संस्था, ज्येष्ठ निर्माते–दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

डॉ. शिंदे म्हणाले की, आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक जडणघडणीत डॉ. एन.डी. पाटील यांचे अतिशय महत्त्वाचे योगदान आहे. समाजकारणासाठी राजकारणाचा वापर करणाऱ्या एका ध्येयनिष्ठ विचारवंतांच्या फळीचे ते प्रतिनिधी आहेत. नैतिकता हा त्यांच्या प्रत्येक कार्याचा आणि आंदोलनाचा प्रमुख कणा आहे. कोल्हापुरातील टोल हटाव, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, शेतकरी, कष्टकऱ्यांची, कामगारांची चळवळ किंवा कर्नाटक–महाराष्ट्राचा सीमाप्रश्नाचा लढा डॉ. पाटील यांनी या साऱ्या चळवळींना प्राप्त करून दिलेले नैतिक अधिष्ठान ही फार मोलाची बाब आहे. शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या योगदानाबद्दल सन २००६ मध्ये विद्यापीठाची सर्वोच्च मानद पदवी डी.लिट. देऊन त्यांचा गौरव केला आहे.

यावेळी शोध समितीचे सदस्य डॉ. जे.एफ. पाटील म्हणाले की, अद्ययावत संदर्भांच्या अभ्यासासह भूमिका घेण्याचा डॉ. एन.डी. पाटील यांचा गुणधर्म हा एकमेवाद्वितीय स्वरुपाचा आहे.

## पाहुणे म्हेवणे

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात शनिवार, १२ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता पुरस्कार प्रदान समारंभ होणार असून सत्कारमूर्ती आणि पाहुणे हा एक योग आहे. माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. पाटील आणि पवार यांचे मेहुणे – मेहुणे असे नाते आहे.

जनसंपर्क कक्ष
28 DEC 2018 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ND Patil to be honoured with Kanbarkar award by SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Veteran rationalist N D Patil will be conferred with the fourth Principal R K Kanbarkar award on January 12 at the Shivaji University, Kolhapur (SUK). The award consists of Rs 1.51 lakh cash, memento, and a shawl.

Vice-chancellor Devanand Shinde said Patil has made key contributions to the development of social, political and educational fields in the state. "He has been in the forefront of many agitations from border issue to farmers' plight; he has also played an important role in Shivaji University's evolution. He was the member of the first-ever advisory committee of the SUK. He was also a senate member and the dean of the social sciences faculty. Patil was conferring DLit by the SUK in 2006."

J F Patil, a member of the search committee said the committee unanimously finalised N D Patil's name in the first meeting itself.

The SUK officials said Patil was born in Dhawali (Nagaon) in Sangli district. He completed his MA in economics in 1955 and LLB in 1962 from the Pune univiersity. Patil was professor at the Chhatrapati Shivaji College in Satara from 1954 to 1957 and was appointed principal at the Karmaveer Bhaurao Patil College in Islampur in 1960.

Kanbarkar, a social activist, was the vice-chancellor of the SUK from 1980 to 1983. He was the frontline leader of several progressive movements in the city. He was also an executive member of several social and educational organizations. He had played an active role in the creation of the university act in 1974.

This is the fourth year of the Kanbarkar award. The earlier recipients of the award are director Jabbar Patel, Satara-based Rayat Shikshan Sanstha and scientist C N R Rao.

सकाळ

# डॉ. एन. डी. यांना कणबरकर पुरस्कार



डॉ. एन. डी. पाटील

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा यंदाचा प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या हस्ते येत्या १२ जानेवारीला पुरस्काराचे वितरण होईल. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सायंकाळी पाचला कार्यक्रमास सुरुवात होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. १ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव, रयत शिक्षण संस्था व ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना यापूर्वी या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

पान ८ वर »

Kolhapur, Main
28/12/2018 Page No. 1

सकाळ

# डॉ. एन. डी. यांना कणबरकर पुरस्कार

» पान १ वरून

डॉ. शिंदे म्हणाले, ''विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी कणबरकर कुटुंबीयांनी विद्यापीठाकडे २५ लाख रुपयांची ठेव प्रदान केली आहे. श्रीमती शालिनी कणबरकर यांच्यासमवेत झालेल्या सामंजस्य करारातून विद्यापीठाच्या या माजी कुलगुरूंच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्काराची संयुक्त निर्मिती केली. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडासह अन्य क्षेत्रांत अत्युत्कृष्ठ कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक जडणघडणीतील योगदान लक्षात घेता यंदा पुरस्कारासाठी डॉ. पाटील यांची निवड केली आहे.''

ते म्हणाले, ''डॉ. पाटील समाजकारणासाठी राजकारणाचा वापर करणाऱ्या एका ध्येयनिष्ठ विचारवंतांच्या फळीचे प्रतिनिधी आहेत. नैतिकता हा त्यांच्या प्रत्येक कार्याचा व आंदोलनाचा प्रमुख कणा आहे. त्या बळावर त्यांनी टोल हटाव आंदोलनापर्यंतची अनेक आंदोलने यशस्वी केली. संयुक्त महाराष्ट्राचा लढा, शेतकरी, कष्टकरी व कामगार चळवळ असो किंवा आजही सुरू असलेला कर्नाटक-महाराष्ट्र सीमालढा असो, त्यांनी या चळवळींना नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे.''

पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शोध समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य डॉ. भालबा विभूते, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील उपस्थित होते.

**“ शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी आग्रही असणाऱ्यांत डॉ. पाटील आघाडीवर राहिले. स्थापनेनंतरच्या कालखंडातही विद्यापीठाच्या जडणघडणीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विद्यापीठाच्या पहिल्या सल्लागार समितीचे सदस्य, अधिसभा सदस्य, कार्यकारिणी सदस्य, सामाजिकशास्त्र अधिष्ठाता असा त्यांचा अनेकांती प्रवास झाला आहे. त्यांच्या योगदानाबद्दल २००६ मध्ये विद्यापीठाने त्यांचा मानद पदवी डी.लिट. देऊन गौरव केला आहे.**

**– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू**

Kolhapur, Main
28/12/2018 Page No. 8

लोकमत

## शिवाजी विद्यापीठाकडून गौरव :

## शरद पवार यांच्या हस्ते १२ला वितरण

# एन. डी. पाटील यांना कणबरकर पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे



ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना या वर्षीच्या 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर' या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

पुरस्काराचे वितरण माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते दि. १२ जानेवारीला सायंकाळी साडेपाच वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व पुरस्कार निवड समितीचे सदस्य, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी गुरुवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

> माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर हे शिक्षणक्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेले काम मोलाचे आहे. अशा व्यक्तीच्या नावे दिला जाणारा पुरस्कार मला जाहीर झाला, ही सन्मानाची गोष्ट आहे. - **प्रा. एन. डी. पाटील**

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, ज्येष्ठ विचारवंत प्रा. पाटील यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक जडणघडणीत महत्त्वाचे योगदान आहे. त्यांच्या या कार्याचा, योगदानाचा सन्मान करण्यासाठी (पान ९ वर)

लोकमत

# एन. डी. पाटील यांना 'कणबरकर' पुरस्कार

(पान १ वरून) विद्यापीठातर्फे त्यांना 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर' या राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या पुरस्काराचे स्वरुप एक लाख ५१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह असे आहे. विद्यापीठ आणि शालिनी कणबरकर यांच्यातील सामंजस्य करारानुसार विद्यापीठाचे माजी कुलगुरु व प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मरणार्थ या पुरस्काराची निर्मिती केली आहे.

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. पाटील म्हणाले, समितीच्या अवघ्या एकाच बैठकीत एकमताने यंदाच्या पुरस्कारासाठी प्रा. एन. डी. पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्यांना पुरस्कार देताना होणारा आनंद हा खूप मोठा आहे. या पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, निवड समितीचे सदस्य प्राचार्य बी. एन. खोत उपस्थित होते.

## विद्यापीठाच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका

विद्यापीठाच्या जडणघडणीत प्रा. पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विद्यापीठाच्या पहिल्या सल्लागार समितीच्या सदस्यत्वापासून सुरु झालेला त्यांचा प्रवास पुढे अधिसभा सदस्य, कार्यकारिणी सदस्य, सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता असा अनेकांगांनी झाला. विद्यापीठाने त्यांच्या योगदानाबद्दल सन २००६ मध्ये डी. लिट. देऊन त्यांचा गौरव केला असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

## पहिल्यांदाच असा योग

प्रा. पाटील यांना माजी केंद्रीय कृषिमंत्री पवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्याचा योग पहिल्यांदाच विद्यापीठाच्या माध्यमातून आला आहे. त्यामुळे पुरस्कार प्रदान कार्यक्रमाला एक वेगळी उंची प्राप्त होणार असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.


पुरस्काराबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रा. एन. डी.पाटील म्हणाले, 'कणबरकर यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी झोकून देऊन काम केले. राजर्षी शाहू महाराजांप्रती त्यांच्या मनात आत्यंतिक आदर होता. त्यांनी तो त्यांच्यावर ग्रंथ लिहून व्यक्त केला आहे. या ग्रंथाची प्रस्तावना मी लिहावी, असा आग्रह त्यांनी धरला होता. मी ती आनंदाने लिहिली. मला राजर्षी शाहू पुरस्कार देण्यात आला, त्यावेळी माझे मानपत्र कणबरकर सरांनी स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिले होते. माझे व त्यांचे अनेक वर्षांचे ऋणानुबंध होते. हे ऋणानुबंध या पुरस्कारामुळे त्यांच्या मृत्यूनंतरही घट्ट राहिले.'

पुढारी

# प्रा. एन. डी. पाटील यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य आर. के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना गुरुवारी जाहीर करण्यात आला. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात १२ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते पुरस्कार दिला जाणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आदी क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला १ लाख ५१

### शरद पवार यांच्या हस्ते १२ जानेवारीला वितरण

हजार रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यापूर्वी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सी. एन. आर. राव (२०१६), रयत शिक्षण संस्था (२०१७), ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल (२०१८) यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक जडणघडणीत डॉ. पाटील यांचे अतिशय महत्त्वाचे योगदान आहे. समाजकारणासाठी राजकारणाचा वापर करणाऱ्या एका ध्येयनिष्ठ विचारवंतांच्या फळीचे ते प्रतिनिधी आहेत. नैतिकता हा त्यांच्या प्रत्येक कार्याचा आणि आंदोलनाचा प्रमुख कणा आहे. त्या बळावर त्यांनी अगदी अलीकडच्या टोल हटाव आंदोलनापर्यंतची अनेक आंदोलने यशस्वी केली आहेत. शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या योगदानाबद्दल २००९ मध्ये विद्यापीठाची सर्वोच्च मानद पदवी डी.लिट. देऊन गौरव केला आहे.

शोध समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, समितीच्या एकाच बैठकीत आणि एकमताने यंदाच्या पुरस्कारासाठी एन. डी. पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. कारण त्यांचे सामाजिक नेतृत्व आणि कर्तृत्व हे जागतिक स्तरावरचे आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, शोध समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2018
तरूण भारत

# डॉ. एन. डी. पाटील यांना कणबरकर पुरस्कार जाहीर

- कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती
- १२ जानेवारी २०१९ रोजी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्राचार्य आर.के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन.डी. पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे. शनिवार दि. १२ जानेवारी २०१९ रोजी सायंकाळी ५.३० वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात माजी केंद्रीय कृषीमंत्री, खासदार शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठाचे माजी कुलगुरू (स्व.) प्राचार्य रा.कृ. कणबरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबियांनी विद्यापीठाकडे २५ लाखांची ठेव प्रदान केली आहे. श्रीमती शालिनी कणबरकर यांच्याबरोबर झालेल्या सामंजस्य करारातून 'प्राचार्य आर.के. कणबरकर पुरस्कारा'ची संयुक्त निर्मिती केली आहे. १ लाख ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

विद्यापीठाच्या स्थापनेसाठी आग्रही असणाऱ्यांमध्ये आघाडीवर असलेल्या डॉ. पाटील यांनी स्थापनेनंतरच्या कालखंडातही विद्यापीठाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विद्यापीठाने त्यांच्या योगदानाबद्दल २००६ मध्ये विद्यापीठाची सर्वोच्च मानद पदवी डी. लिट. देऊन त्यांचा गौरव केला आहे. डॉ. जे.एफ. पाटील म्हणाले, समितीच्या अवघ्या एकाच बैठकीत आणि एकमताने यंदाच्या पुरस्कारासाठी डॉ. पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.


# प्रा. एन. डी. पाटील यांना कणबरकर पुरस्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना जाहीर झाला आहे. माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्याहस्ते बारा जानेवारीला पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता कार्यक्रम होईल. रोख १,५१,००० रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

▶ सविस्तर वृत्त.. २

# डॉ. एन. डी. पाटील यांना कणबरकर पुरस्कार जाहीर

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य रा.कृ.कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन.डी. पाटील यांना जाहीर झाला. माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते येत्या बारा जानेवारीला पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे २५ लाख रुपयांची ठेव प्रदान केली आहे. श्रीमती शालिनी कणबरकर यांच्या समवेत झालेल्या सामंजस्य करारातून 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार'ची संयुक्त निर्मिती झाली. विद्यापीठाने यापूर्वी शास्त्रज्ञ व भारतरत्न डॉ. सी. एन. राव (२०१६), रयत शिक्षण संस्था (२०१७) व निर्माते दिग्दर्शक जब्बार पटेल (२०१८) यांना पुरस्कार दिला आहे. रोख १,५१,००० रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे.'

**१२ जानेवारीला शरद पवार यांच्या हस्ते वितरण**

पुरस्काराविषयी बोलताना ते म्हणाले, 'राज्याच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय जडणघडणीत डॉ. पाटील यांचे महत्वाचे योगदान आहे. समाजकारणासाठी राजकारणाचा वापर करणाऱ्या ध्येयनिष्ठ विचारवंतांच्या फळीचे ते प्रतिनिधी आहेत. नैतिकता हा त्यांच्या प्रत्येक कार्याचा आणि आंदोलनाचा प्रमुख कणा आहे. त्या बळावर त्यांनी टोल हटाव आंदोलनापर्यंतची अनेक आंदोलने यशस्वी केली. संयुक्त महाराष्ट्राचा लढा, शेतकरी, कष्टकरी, कामगारांची चळवळ, सीमाप्रश्नाचा लढा या साऱ्या चळवळींना नैतिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले. विद्यापीठाची स्थापना व त्यानंतरच्या जडणघडणीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. विद्यापीठाने त्यांच्या योगदानाबद्दल २००६ मध्ये त्यांना विद्यापीठाची सर्वोच्च मानद पदवी डि.लिट देऊन गौरव केला आहे.'

## पवारांच्या हस्ते पहिल्यांदाच सत्कार

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले,' शरद पवार आणि एन.डी.पाटील ही महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील दोन मोठी व्यक्तिमत्वे आहेत. पवार यांच्या हस्ते डॉ. पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्याचा योग विद्यापीठाच्या माध्यमातून पहिल्यांदाच जुळून आला आहे. यामुळे हा कार्यक्रम सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रासाठी खूप महत्वाचा ठरणारा आहे. या कार्यक्रमाविषयी मलाही कमालीची उत्सुकता लागून राहिलीय.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2018
तरुण भारत

# विद्यापीठात आज आविष्कार संशोधन स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत जिल्हास्तरीय, पदव्युत्तर तसेच मध्यवर्ती अशा तीन स्तरांवरील 'आविष्कार-२०१८-१९" स्पर्धेचे शुक्रवारी (दि. २८) विद्यापीठातील लोककला केंद्रात आयोजन केले आहे. सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन होणार आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या वतीने स्पर्धेचे संयोजन केले आहे. या स्पर्धेत मानव्यशास्त्र, भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यक व औषधनिर्माण शास्त्र अशा विविध विषयांमधील दोनशेहून अधिक संशोधक सहभागी होणार आहेत. स्पर्धेत शोधनिबंध, पोस्टर सादरीकरण, पॉवरपॉईंट सादरीकरण आणि मॉडेल्स अशा विविध प्रकारांत संशोधकांचे संशोधन मांडण्यात येईल. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच एम. फील. व पीएच. डी.चे संशोधन करणारे संशोधक विद्यार्थी, शिक्षक स्पर्धेत सहभागी होणार आहेत. उद्‌घाटन प्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह वायसीएसआरडीचे संचालक डॉ. समन्वयक डॉ. प्रकाश पवार आदी उपस्थित राहतील.

**प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती**

शुक्रवार ४ जानेवारी २०१९ रोजी आविष्कार स्पर्धेत पदवी स्तरावरील संशोधक विद्यार्थ्यांबरोबरच या स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या पदव्युत्तर स्तरावरील स्पर्धकही सहभागी होणार आहेत.

पुढारी

# प्लास्टिकचा वापर केलेला रस्ता होणार

## कामास गती : असा रस्ता करणारे शिवाजी विद्यापीठ देशातील एकमेव



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सिथेंटिक ट्रॅक मार्गावर प्लास्टिकचा वापर करून रस्ता बनवला जात आहे.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात प्लास्टिकचा वापर केलेला रस्ता करण्याचे काम वेगाने सुरू आहे. हा डांबरी रस्ता असून यामध्ये प्लास्टिक मिक्स केले जाणार आहे. कॅम्पसमध्ये प्लास्टिकचा वापर करून रस्ता करणारे देशातील हे एकमेव विद्यापीठ असल्याचा दावा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केला आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठ कॅम्पसमध्ये आम्ही यापूर्वीच प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने पाऊल टाकले आहे. प्लास्टिकचे विघटन होत नसल्याने त्याला नष्ट करणे हे अशक्यप्राय असते. प्लास्टिकचा वापर रस्त्यासाठी केल्यावर खूप मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचे निराकरण होणार आहे. सध्या या रस्त्याचे काम सुरू असून लवकरच हा रस्ता पूर्ण होईल. सध्या केमिस्ट्री अधिविभागापासून सिंथेटिक ट्रॅकपर्यंत सुमारे ८०० मीटरचा रस्ता हा बनवला जात आहे. दरम्यान यापुढे सिथेंटिक ट्रॅकचा वापर इतर क्रीडा प्रकारांसाठी केला जाणार असल्याचेही डॉ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

लोकमत

## तीन महिन्यांत खुला : ८०० मीटरच्या या रस्त्याला विद्यापीठाकडून 'शिवमार्ग' असे नाव

# शिवाजी विद्यापीठात होणार पर्यावरणपूरक रस्ता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मुरुम आणि प्लास्टिक यांच्या मिश्रणाचा वापर करून पर्यावरणपूरक रस्ता करण्यात येणार आहे. प्रायोगिक तत्त्वावरील प्रकल्पांतर्गत त्याचे काम सुरु झाले असून, तीन महिन्यांत हा रस्ता खुला होणार आहे. ८०० मीटरच्या या रस्त्याला विद्यापीठाने 'शिवमार्ग' असे नाव दिले असल्याचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी येथे पत्रकार परिषदेत सांगितले.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाची इमारत ते सिंथेटिक ट्रॅकपर्यंतचा ८०० मीटरचा पर्यावरण रस्ता केला जाणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. हा रस्ता प्रेक्षणीय बनविण्यात येणार आहे. हे काम त्रयस्थ संस्थेच्या माध्यमातून केले जाणार आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, विद्यापीठात नवे अंतर्गत रस्ते केले जात आहेत. याबाबतचे काम पाहणाऱ्या समितीने प्लास्टिक वापरून रस्ता करण्याचे सुचविले. त्याला मान्यता देत प्रशासनाने त्याचे काम सुरु केले आहे. डांबरी रस्त्याच्या तुलनेत हा रस्ता करण्यासाठी २५ टक्के कमी खर्च येतो. मुरुम, प्लास्टिक यांच्या मिश्रणाचा वापर करुन हा पर्यावरण पुरक पद्धतीचा रस्ता केला जाणार आहे.



**शिवाजी विद्यापीठात मुरुम आणि प्लास्टिकच्या मिश्रणाचा वापर करून अंतर्गत रस्ता करण्यात येणार आहे. त्याचे प्राथमिक स्वरुपातील काम सुरु झाले आहे.**

### सिंथेटिक ट्रॅकचा वापर वाढविणार

**विद्यापीठाचा सिंथेटिक ट्रॅक सध्या केवळ धावणे या प्रकारासाठी वापरला जातो. तो उंच उडी, लांब उडी, भालाफेक, थाळीफेक, आदी विविध मैदानी क्रीडाप्रकारांसाठी वापरण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. या क्रीडाप्रकारांसाठीच्या पायाभूत सुविधा या ठिकाणी उपलब्ध करुन दिल्या जाणार असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.**